**(CNR No.:- MHRG-14000355-2022)**

(ताईबाई काशिनाथ पाटील विरुध्द कमळाकर रामदास पाटील )

**<u>नियमित दिवाणी दावा क्रमांक ४०/२०२२ मधील निशाणी ५ वरील आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी तुर्तातूर्त ताकीदीसाठी केलेला आहे. वादी यांनी सदर अर्जाद्वारे दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी यांनी अथवा त्यांचे मार्फत हक्क सांगणा–या व्यक्ति यांनी दावा मिळकतीमध्ये अन्य त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत तसेच दावा मिळकतीचे स्वरुप बदलू नये अशी तुर्तातूर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे.

२. प्रतिवादींनी दाव्याचे कामी हजर होऊन निशाणी ३२ येथे वादीच्या तुर्तातुर्त मनाई अर्जास म्हणणे व दाव्यास कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादींनी तुर्तातूर्त मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. सदर प्रतिवादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादीने अत्यंत महत्वाची माहिती लपवून ठेवल्याने वादींना समानतेचा हक्क मागण्याचा हक्क नाही. वादींचे दाव्यात आवश्यक पक्षकारांना सामील न केल्याने नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीज या तत्वाची बाधा येते. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवीद यांच्या पूर्वजांमध्ये वाटप होवून दावा मिळकती या प्रतिवादींचे हिश्याला आलेल्या असून त्या प्रतिवादींच्या स्वतंत्र मिळकती आहेत. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादींना हक्क मागण्याचा हक्क नाही.

दावा मिळकती या वादी व प्रतिवादींच्या वडीलोपार्जित सामाईक मिळकती नाहीत. त्यामुळे प्रतिवादींनी वादींचा तुर्तातूर्त मनाई अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

३. वादींचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. वादींतर्फे व प्रतिवादींतर्फे विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

४. प्रस्तुत अर्जाच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात. सदर मुद्दयांचे निष्कर्ष मी कारणमिमांसेसह नोंदविले आहेत ते खालीलप्रमाणे :

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | वादी यांनी सकृतदर्शनी दावा त्यांचे बाजूने असलेचे सिध्द केले आहे काय ? | : | ... होकारार्थी |
| २ | न्यायाचे समतोलत्व वादी यांच्या लाभात असल्याचे वादी यांनी सिध्द केले आहे काय ? | : | ... होकारार्थी |
| ३ | अंतरीम मनाई अनुतोष न दिल्यास वादींचे कशानेही न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल, हे वादी यांनी सिध्द केले आहे काय ? | : | ... होकारार्थी |
| ४ | आदेश काय ? | : | ... अर्ज मंजूर करणेत आला. |

## कारणमिमांसा

५. वादी यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी ४/१ कडे मौजे कळंबुसरे येथील स.नं.९९, हि.नं.८ड ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/२ कडे मौजे कळंबुसरे येथील स.नं.१३७, हि.नं.१ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/३ कडे मौजे कळंबुसरे येथील स.नं.१४६, हि.नं.३ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/४ कडे मौजे कळंबुसरे येथील स.नं.१४८, हि.नं.८ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/५ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. ६०२ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/६ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. १२२७ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/७ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. ११०८ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/८ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. १७६८ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/९ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. १४१५ ची सही–शिक्याची प्रत, निशाणी ४/१० कडे मौजे चिरनेर येथील फेरफार क्र.८२९५ ची सही–शिक्याची प्रत दाखल केली आहे.

६. प्रतिवादी यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून निशाणी २७/१ कडे मौजे कळंबुसरे येथील फेरफार क्र. १४६१ ची छायांकित प्रत, निशाणी २७/२ कडे दिनांक ०८.०५.१९६६ रोजीचे कब्जेगहाण खताची छायांकित प्रत व निशाणी २७/३ कडे दिनांक ०१.०९.१९९७ रोजीचे सिताबाई बाळाराम नारंगीकर यांच्या प्रतिज्ञापत्रची छायांकित प्रत दाखल केली आहे.

**<u>मुद्दा क्रमांक १ बाबत</u> –**

७. सदर कामी वादीचे असे कथन आहे की, दावा मिळकती या मूळ पुरुष मंगळया गणू पाटील याच्या होत्या. त्याच्या मृत्युनंतर फेरफार क्र.१४१५ नुसार मंगळयाचा मुलगा अंबु, रामदास व मुलगी चांगूबाई कमळया भोईर यांची नावे दावा मिळकतीस नोंद झाली. परंतु फेरफार क्र. १४६१ ने बेकायदेशीररित्या अंबु मंगळया पाटील यांचे नाव दावा मिळकतीतून कमी करण्यात आले. वादी व प्रतिवादी यांच्या चिरनेर येथील अन्य मिळकतीवर फेरफार क्र.८२९५ ने वादींचे वडीलांचे मृत्युनंतर वादींचे नावाची नोंद झाली आहे. फेरफार क्र. १४६१ हा बेकायदेशीर असून त्याबाबत वादी पुढील कारवाई करीत आहेत. परंतु तत्पूर्वी वादी क्र. १ च्या वडीलांचे व वादी क्र. २ ते ५ यांचे आजोबा यांचे नाव दावा मिळकतीवरुन कमी झाल्याचा गैरफायदा घेवून प्रतिवादी हे दावा मिळकती तबदिल करु पहात आहेत. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण केलयास अथवा त्याचे स्वरुप बदलल्यास वादींचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादींनी प्रतिवादींविरुध्द प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्थांचे हक्क संबंध निर्माण करु नयेत, दावा मिळकतीचे स्वरुप बदलू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेशाची मागणी केली आहे.

८. प्रतिवादी यांनी सदर कामी निशाणी ३२ येथे कैफियत दाखल करुन वादींचा दाव्यातील व मनाई अर्जातील संपूर्ण मजकूर नाकारला आहे. प्रतिवादींचे कथनाप्रमाणे दावा मिळकती या वाटणीप्रमाणे प्रतिवादींच्या मिळकती असून त्यामध्ये वादींचा कोणताही हक्क नाही. सबब, वादींचा अर्ज व दावा फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

९. वादींनी त्यांचा दावा मिळकतीमधील हक्क दाखविण्याकरीता निशाणी ४/९ येथे फेरफार क्र. १४१५ दाखल केला आहे. सदर फेरफाराचे अवलोकन करता त्यामध्ये सकृतदर्शनी असे दिसून येते की, मंगळया गण्या पाटील यांचे अंबु, रामचंद्र व चांगुबाई असे वारस आहेत. प्रतिवादींचे असे कथन आहे की, दावा मिळकतींबाबत वादी व प्रतिवादी यांचे वडील यांच्यात वाटणी होवून दावा मिळकती प्रतिवादींचे वाटपास आलेल्या आहेत. परंतु सदर वाटप दाखविणारा कोणताही सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा प्रतिवादींनी अभिलेखावर दाखल केलेला नाही. निशाणी ४/५ येथील फेरफार क्र. ६०२, ४/७ येथील फेरफार क्र. ११०८ व ४/८ येथील फेरफार क्र.१७६८ चे सकृतदर्शनी अवलोकन करता असे दिसून येते की, दावा मिळकती या मंगळया पाटील याच्या नावे होत्या. त्यामुळे सदर दावा मिळकतींमध्ये मुलगा या नात्याने अंबु पाटील व अंबु पाटीलची मुलगी व नातवंडे या नात्याने वादींचा हक्क असल्याचे सकृतदर्शनी

दिसून येते. त्यामुळे वादींना याकामी सकृतदर्शनी दावा असल्याचे दिसून येते. त्यामुळे मी मुददा क्र. १ बाबत होकारार्थी मत नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्रमांक २ बाबतः–</u>**

१०. सदर कामी प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दावा मिळकती या त्यांना वाटपाने मिळालेल्या आहेत. परंतु त्याचे शाबिती करीता प्रतिवादी यांनी कोणताही सकृतदर्शनी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. वादींचे याकामी असे कथन आहे की, त्यांचा दावा मिळकतींमध्ये वारसा हक्क आहे. त्याकरीता वादींनी अभिलेखावर दावा मिळकतींचे सातबारे उतारे व फेरफार उतारे दाखल केले आहेत. सदर कागदपत्रांचे अवलोकन करता सकृतदर्शनी असे दिसून येते की, दावा मिळकती या पूर्वी वादी व प्रतिवादींचे पूर्वहक्कदार मंगळया पाटील यांच्या नावे होत्या व त्या त्यानंतर प्रतिवादींचे नावे झालेल्या आहेत. दाव्याच्या कामी पुराव्या अंती दावा मिळकतींबाबत वाटणी झाली किंवा कसे हे शाबीत होणार आहे. परंतु, सद्यपरिस्थितीत अभिलेखावर उपलब्ध कागदपत्रांवरुन वादींचा दावा मिळकतीमध्ये सकृतदर्शनी हक्क दिसून येतो. वादींचा हक्क डावलून प्रतिवादींनी दावा मिळकती तबदिल केल्यास वादींचा दावा निष्फळ ठरणार आहे. त्यामुळे सदरकामी वादी मागतात त्याप्रमाणे मनाई देण्याकरीता वादींच्या लाभात न्यायाचे समतोलत्व असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. त्यामुळे मी मुद्दा क्रमांक २ चे मत होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबतः–</u>**

११. वादींचे असे कथन आहे की, प्रतिवादी हे दावा मिळकतींमध्ये त्रयस्थ इसमांचे हक्क निर्माण करणार आहेत. मुददा क्र. १ नुसार वादींना दावा मिळकतीमध्ये हक्क असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याच्या मतापर्यंत मी आलेलो आहे. दावा मिळकतीच्या मिळकत उता–यांचे अवलोकन करता त्यावर केवळ प्रतिवादींच्या नावाची नोंद आहे. त्यामुळे दावा मिळकती तबदिल करणे प्रतिवादींना अडचणीचे ठरणार नाही. दावा मिळकतींमध्ये वादींचा हक्क आहे किंवा कसे हे पुराव्याअंती ठरणार आहे. परंतु तत्पूर्वी दावा मिळकती प्रतिवादींनी तबदिल केल्यास त्यामध्ये त्रयस्थांचे हक्क निर्माण होतील. त्यामुळे दाव्यांची संख्या वाढून वादी व प्रतिवादींमध्ये असलेला गुंतागुंतीचा मुद्दा अधिकच अडचणीचा ठरणार आहे. प्रतिवादीविरुध्द मनाई दिल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान संभवत नाही. परंतु, दावा निकालापावेतो प्रतिवादींविरुध्द मनाई न दिल्यास वादींचे हक्क अडचणीत येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादींचे कशानेही न भरुन येणारे असे नुकसान होणार आहे. सदर नुकसानाची पैशात आकारणी करता येणार नाही. सबब, वादी मागतात त्याप्रमाणे मनाई न दिल्यास वादींचे अतोनात नुकसान होणार आहे हे वादींनी सकृतदर्शनी दाखवून दिल्याने मी मुद्दा क्र. ३ बाबत होकारार्थी मत नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ४ बाबतः-</u>**

१२. माझे मते वादींनी त्यांच्या बाजूने सकृतदर्शनी दावा व न्यायाचा समतोल आहे, तसेच प्रतिवादीस तुर्तातुर्त ताकीद न दिल्यास त्यांचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे असे सिध्द केल्यामुळे, वादी हे प्रतिवादी यांचे विरुध्द तुर्तातुर्त मनाई मागणेस पात्र आहेत. सदयस्थितीत अर्जाचा खर्च अंतिम निकालात समाविष्ट करणे योग्य होईल. म्हणून मी मुददा क्र. १ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुददा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | वादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | दाव्याचा अंतिम निकाल लागेपावेतो प्रतिवादी अथवा त्यांचे मार्फत हक्क सांगणा-या व्यक्ति यांनी दावा मिळकतीमध्ये अन्य त्रयस्थांचे हक्क हितसंबंध निर्माण करु नयेत तसेच दावा मिळकतीचे स्वरुप बदलू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश देण्यात येत आहे. |
| ३. | अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालामध्ये समाविष्ठ करण्यात येत आहे. |

WALI NILESH MALAKAPPA
Digitally signed by WALI NILESH MALAKAPPA
Date: 2022.11.11 13:04:13 +0530

ठिकाणः उरण (निलेश म. वाली)
दिनांकः- १०/११/२०२२. दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उरण.